**नियमित दिवाणी दावा कं. १६५/२०१२ मधील नि. १०८ वरील आदेश**
**सी.एन.आर.क.एम.एच.एस.आय.०६—०००४५३—२०१२**

१. वादीने या अर्जाद्वारे अर्जात नमुद साक्षीदाराला जबाब देणेकरीता साक्षीसमन्स पाठविणेस विनंती केलेली आहे. प्रतिवादींनी या अर्जास हरकत घेवून या दाव्याचे कामी पूर्वीचे आदेश विचारात घेवून अर्ज चालणेस पात्र नसल्यामुळे नामंजूर होणेची विनंती केलेली आहे. उभय पक्षकारांतर्फे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. वादीने यापूर्वी साक्षीसमन्स द्वारे साक्षीदाराची मागणी केली आहे. त्यानुसार साक्षीदारास साक्षीसमन्साची तामील झाली आहे. तथापि, सदरचे साक्षीदाराची प्रकृती अस्वस्थ असल्यामुळे तो साक्ष देणेकरीता उपस्थित राहू शकत नाही अशी नि. १०७ वर पुरशीस देणेत आली आहे. वादीतर्फे विधिज्ञ यांनी सदरचे साक्षीदाराची प्रकृती अस्वस्थ असल्यामुळे वादीने हा साक्षीदार तपासणेचा नाही असे नमुद केले. त्यानंतर प्रस्तुतचा अर्ज साक्षीसमन्स देणेकरीता दाखल केलेला आहे. सदय परिस्थितीमध्ये वादीचा यापूर्वी अर्ज मंजूर करणेस पात्र असल्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

—: :— **आदेश** —: :—

१. वादीचा नि. १०८ वरील अर्ज मंजूर करणेत येतो.

२. अर्जामध्ये नमुद साक्षीदारास याकामी जबाब देणेकरीता साक्षीसमन्स पाठवावे.

३. साक्षीभत्ता वादीने कथन केल्याप्रमाणे साक्षीदारास समक्ष देणेचा आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by Rupali Rajanikant Bedagkar
Date: 2019.09.24 11:38:50 +0530

(आर.आर.बेडगकर)
दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर),
सावंतवाडी.

दिनांक —२३/०९/२०१९.